**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचेकडे प्राप्त होणारे सर्व अपीले विहित मुदतीत निकालात काढणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**शासन परिपत्रक क्र. केंमाअ-२००७/११८२/प्र.क्र. ६५/०७/६ (मा.अ.)**

सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १२ डिसेंबर, २००७

**परिपत्रक :-**

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती अधिकाऱ्यांनी एक महिन्यात अर्जदारास माहिती पुरविणे आवश्यक आहे. पुरविलेल्या माहिती संदर्भात अर्जदार असमाधानी असल्यास, तो प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील दाखल करु शकतो व त्यावर प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याने सर्वसाधारण परिस्थितीत ३० दिवसात व अपवादात्मक परिस्थितीत ४५ दिवसात निर्णय घेणे आवश्यक आहे. प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयामुळे अर्जदाराचे समाधान झाले नसल्यास, कलम १९(३) अन्वये तो मुख्य आयुक्त, राज्य माहिती आयोग यांचेकडे द्वितीय अपील दाखल करु शकतो.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील उपरोक्त तरतूदीच्या अनुषंगाने राज्य माहिती आयोगाने शासनाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, जवळ जवळ ४५ टक्के प्रकरणांवर प्रथम अपिलीय अधिकारी अर्जदारांची अपीले निकाली काढताना आदेश पारीत करीत नाहीत किंवा आदेश पारीत केले असल्यास ते पारीत करण्यापूर्वी संबंधित अर्जदारास सुनावणीची संधी देत नाहीत. अशाप्रकारे प्रथम अपिलीय अधिकारी या अधिनियमान्वये त्यांचेवर सोपविण्यात आलेली जबाबदारी योग्यरितीने पार पाडीत नाहीत. पर्यायाने अर्जदाराच्या हालअपेष्टांत भर पडत असून त्यांना यथोचित न्याय मिळत नाही. त्याचबरोबर त्यांच्या या वर्तणूकीमुळे राज्य माहिती आयोगाकडे दाखल होणाऱ्या द्वितीय अपीलाच्या अनुषंगाने त्यांच्याही कामकाजात अनावश्यकपणे वाढ होत आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत राज्य शासनाकडील विविध मंत्रालयीन विभागांकडे व त्यांचे अधिपत्याखालील क्षेत्रिय प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे दाखल होणारी प्रथम अपिले ही समन्यायीक (quasi-judicial) स्वरुपाची असून प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी या अनुषंगाने नैसर्गिक न्यायाच्या तत्वाचे पालन करणे क्रमप्राप्त ठरते. म्हणून प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी अर्जदारास त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन प्रकरण निकाली काढणे आवश्यक असते.

वरील पार्श्वभूमी लक्षात घेता सर्व मंत्रालयीन विभागातील तसेच सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडील प्रथम अपिलांवर निर्णय घेण्यापूर्वी संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी मिळण्याकरिता सुनावणी पूर्वी किमान ७ दिवस अगोदर नोटीस मिळेल अशा पध्दतीने सुनावणी घेऊन

उचित समर्थनासह आवश्यक ते स्वयंस्पष्ट आदेश पारीत करावेत. अपिलकर्त्यास नोटीस पाठविताना, त्याची इच्छा असल्यास तो स्वतः किंवा त्याचा प्रतिनिधी सुनावणीस उपस्थित राहू शकेल किंवा सुनावणीस उपस्थित न राहण्याचा पर्याय स्वीकारु शकेल असा उल्लेख नोटीसीत करण्यात यावा व सदर नोटीस **पोस्टाचा दाखला घेऊन (अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने)** पाठवावी. जेणेकरुन अपिलकर्त्यास सुनावणीच्या वेळी त्याचे म्हणणे मांडण्यास पूर्ण वाव मिळून अन्याय झाल्याची भावना निर्माण होणार नाही व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची अंमलबजावणी अधिनियमातील तरतूदीनुसार राज्यभरात काटेकोरपणे होईल.

हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर संगणक सांकेतांक क्र. २००७१२१२१६४१५८००१ वर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशाने व नावाने,

**टी. एफ. थेक्केकरा**
**शासनाच्या प्रधान सचिव.**

**प्रत :-**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
● प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
● प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
● सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
● सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
मंत्रालयीन विभागाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
मुख्य सचिवांचे सह सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व मंडळ / महामंडळे व शासनाचे सर्व सार्वजनिक उपक्रम
सर्व महानगर पालिका / नगरपालिका / नगर परिषद
निवड नस्ती, सा.प्र.वि., कार्यासन क्र. ६.

● पत्राने